# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक ०२.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०१/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ६४,९५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०१/०८/२०२२ रोजी दारूबंदी कायदयाअंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन कळमनुरी ०१ ,सेनगाव ०१,बासंबा ०१,कुरूंदा ०१ असे एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ११.५२ लिटर दारू असा एकुण १२,७६०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. ०१/०७/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे गोरेगाव येथे ०१ तसेच पोस्टे हटटा येथे ०१ अशा एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू. असा एकुण ३,३४०/—रू माल जप्त करण्यात आला असुनआरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपासकरण्यात येत आहे.

**खुन :—**दिनांक ०१/०८/२०२२ रोजी फिर्यादी बबन विठ्ल पोटे रा.पांगरा शिंदे ता. वसमत जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३०२ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.३१.०७.२२ रोजी चे ०८:०० ते ०९:०० वा पासुन ते ०१.०८.२२ रोजी चे १३:३० वा दरम्याण अज्ञात आरोपीने फिर्यादीचा भाउ रोहिदास विठ्ल पोटे यास कशाणे तरी व कोणत्यातरी कारणावरून डोक्यात, पाठीत,पायाला तसेच अंगावर जागोजागी जख्मा करून जिवे ठार मारले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.

चोरी :— दिनांक ०१/०८/२०२२ रोजी फिर्यादी अरविंद नामदेव मनोहरे रा.मरळापुर ता.वसमत जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२३.०७.२२ रोजी चे ११:३० वा पासुन ते १३:०० वा चे सुमारास झेंडा चौक वसमत येथे यातील फिर्यादीची मो.सा.हि झेंडा चौक वसमत येथे उभी केली असता कोणतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करित आहेत.

दिनांक ०१/०८/२०२२ रोजी फिर्यादी विकास शिवाजी रणवीर रा.करंजाळा ता.वसमत जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हटटा येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.३१.०७.२२ रोजी चे १६:१५ वा चे सुमारास आठवडी बाजार जवळा बाजार येथील डि.पी. जवळ ओ.पी. जवळा बाजार येथे यातील फिर्यादीने त्याची मो.सा. आठवडी बाजार जवळा बाजार परीसरात डि.पी.जवळा लावलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.